# प्रेसनोट

दिनांक १०/१२/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री. संदीप पुंडलीक वानखडे, वय–४४ वर्ष, पद–यंत्रचालक, कार्यालय, ३३/११ के.व्ही.सब स्टेशन एम.आय.डी.सि. फेज–२, अकोला (३३/११ के.व्ही. तुकाराम चौक अकोला), रा. कपील वस्तु नगर, अकोला.<br>२) संतशील बोदडे, वायरमन, ३३/११ के.व्ही. सब स्टेशन एम.आय.डी.सि. फेज–२, अकोला (३३/११ के.व्ही. तुकाराम चौक अकोला). |
| ३ | सापळा तारीख | दिनांक १०/१२/२०२४ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | २७,०००/– रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | २७,०००/– रूपये. |
| ६ | घटनास्थळ | ३३/११ के.व्ही. सब स्टेशन एम.आय.डी.सि. फेज–२, अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दि. ०६/१२/२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथे तक्रार दिली की, महावितरणच्या लोकांनी त्यांच्या घराचे विद्युत कनेक्शन कट करून विज मीटर काढुन नेले आहे. त्यामुळे तक्रारदार ३३/११ उपकेंद्र, तुकाराम चौक, अकोला येथे चौकशी करण्याकरीता गेले असता, तेथील कर्मचारी आरोपी श्री. संदीप वानखडे, ऑपरेटर/लॅब टेक्नीशियन यांना भेटुन ''माझ्या घरी लाईट नाही. मला विज मिटर परत लावुन द्या'' अशी विनंती केली. त्यावर आरोपी श्री. संदीप वानखडे यांनी ''तुम्ही तुमचे विज भरून घ्या आणि मला २७,०००/– रूपये द्या. मी तुमचे मिटर माझ्या भरोशावर परत बसवुन देण्याची व्यवस्था करतो'' असे म्हणुन लाच मागणी केली आहे. अशा आशयाच्या तक्रार दिली.

तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०७/१२/२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपी श्री. संदीप वानखडे यांनी २७,०००/–रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच दिनांक ०९/१२/२०२४ रोजी परत पडताळणी कार्यवाही आजमाविली असता, त्यादरम्यान यातील आरोपी क्र. २) श्री. संतशील बोदडे यांनी आरोपी श्री. संदीप वानखडे यांच्या लाच मागणीला समर्थन दिल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी के.व्ही. सब स्टेशन एम.आय.डी.सि. फेज–२, अकोला येथे सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता, सदर कार्यवाही दरम्यान आरोपी श्री. संदीप वानखडे यांनी तक्रारदार यांच्या कडुन विज मिटर परत लावुन देण्याकरीता लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले असुन त्यांच्या विरूध्द पो.स्टे. खदान जि. अकोला येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम–१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. मारूती जगताप, पोलीस अधिक्षक लाप्रवि अमरावती, श्री. सचिंन्द्र शिंदे अपर पोलीस अधिक्षक लाप्रवि अमरावती, श्री. मिलींदकुमार अ. बहाकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सचिन सावंत, पोलीस अंमलदार प्रदिप गावंडे, श्रीकृष्ण पळसपगार, संदीप टाले, सुनिल येलोने, किशोर पवार, डिगांबर जाधव यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा

**मोबाईल क्र.:– श्री. मिलींदकुमार अ. बहाकर पोलीस उप अधिक्षक–९१५८८२२६७६**

**श्री. सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०**

**ऑफिस फोन नं.:–०७२४–२४१५३७०**

**टोल फ्रि क्रं.:– १०६४**

अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला

(मिलींदकुमार अ. बहाकर)
**पोलीस निरीक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला**